# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 11 October 2024
## Time 01.00 to 01.05 PM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक ११ ऑक्टोबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाओस दौऱ्यात आज लाओसचे पंतप्रधान सोनेक्से सिफानदो यांच्यासमवेत द्वीपक्षीय चर्चा केली. परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांची याप्रसंगी उपस्थिती होती.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक मुक्त, समावेशी, समृद्ध आणि नियम–आधारित हिंद महासागर क्षेत्राच्या महत्त्वार भर दिला. हिंद महासागर क्षेत्र पूर्ण भागाच्या शांती आणि प्रगतीसाठी महत्त्वाचं असल्याचं पंतप्रधान म्हणाले. पंतप्रधानांनी आज १९ व्या पूर्व आशिया शिखर परिषेदला संबोधित केलं. जगाच्या विविध भागात सुरु असलेल्या संघर्षावर पंतप्रधानांनी चिंता व्यक्त केली. सध्याचे युग युद्धाचे नसल्याचं पंतप्रधान म्हणाले. दहशतवादाचा निपटारा करण्यासाठी मानवजातीनं मिळून प्रयत्न करण्याची गरज असल्याचं पंतप्रधान मोदी म्हणाले.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतरत्न नानाजी देशमुख यांना त्यांच्या जयंती निमित्त श्रद्धांजलि अर्पण केली आहे. समाज माध्यमांवरील संदेशात त्यांनी, नानाजी देशमुख यांच्या ग्रामिण भागातील सेवा आणि समर्पणामुळं देशाचा सशक्तीकरणाला चालना मिळाल्याचं म्हटलं आहे.

****

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दक्षिण धावपट्टीवर आजपासुन दररोजी हवाई दलाचे सुखोई ३० विमान उड्डाण करणार आहे. याबाबतचा कार्यक्रम आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी लष्कराच्या सी–२९५ या लँडिंग करणाऱ्या विमानाला वॉटर सॅल्युट देण्यात आला.

****

केंद्र सरकारचा इलेक्ट्रॉनिक तसंच माहिती तंत्रज्ञान विभाग आणि राज्य सरकारमध्ये रोबोटिक आणि स्वयंचलित तंत्रज्ञान विकासासाठी करार करण्यात आला आहे. केंद्रिय मंत्री अश्विनी वैष्णव आणि राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी नवी दिल्ली इथं आज या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

****

अनुसूचित जाती–जमाती राज्य आयोग सामाजिक न्यायासाठी कार्यरत असल्याचं अनुसूचित जाती जमाती राज्य आयोगाचे उपाध्यक्ष अॅड. धर्मपाल मेश्राम यांनी सांगितलं आहे. सामाजिक न्यायाच्या दृष्टीनं आज मुंबईत प्राप्त तक्रारीबाबत सुनावणी घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शन आणि सहकार्यानं राज्य आयोग समानता आणि सामाजिक न्यायासाठी कार्यरत आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या अनेक प्रश्नांना न्याय देण्याच्या आणि समाजाच्या उन्नतीच्या दृष्टीनं अनेक योजना शासनानं अंमलात आणल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

****

राष्ट्रपति द्रौपदी मुर्मु यांनी आज दुर्गापूजेनिमित्त देशवाशियांना शुभेच्छा दिल्या आहेत. आपल्या समाज माध्यमांवरिल संदेशात त्यांनी,आई दुर्गा हि शक्तीचं प्रतिक असुन,दुर्गापुजा आपण, वाईट गुणांवर चांगल्या गुणांनी विजय मिळवल्यामुळं साजरा करत असल्याचं म्हटलं आहे. दुर्गापुजा हा सण सर्वधर्मियांमध्ये एकता आणि सामोपचार निर्माण करत असल्याचं सांगत, आई दुर्गा आपणा सर्वांना न्यायसंगत समाज तयार करण्यासाठी साहस आणि शक्ती देवो अशी प्रार्थना केली आहे.

दरम्यान, शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त आज धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूर इथल्या श्री तुळजाभवानी देवीची महिषासूर मर्दिनी अलंकार महापूजा मांडण्यात येणार आहे.

****

नागपूरातील पवित्र दीक्षाभूमीवर आज दीक्षाभूमी स्मारक समितीचे सदस्य आणि समता सैनिक दल यांचा उपस्थितीत भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांचा नेतृत्वात पंचशिल ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी समता सैनिक दलाचे जवान, बौध्द अनुयायी उपस्थित होते. उद्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा मुख्य सोहळा सायंकाळी साजरा केला जाणार असल्याने दीक्षाभूमीवर आजपासूनच हजारों बौध्द

अनुयायी दाखल होत आहेत. बौध्द अनुयायांना प्रशासनाकडून विविध आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून धम्मचक्र प्रवर्तन दिनाची जय्यत तयारी प्रशासनानं केली आहे.

****

राज्यातील दुसरे सौरग्राम होण्याचा माण पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातल्या टेकवडी गावानं पटकावला आहे. १ हजार २३९ लोकसंख्येच्या या गावातील सर्वच घरगुतीसह ७४ वीज जोडण्यांना सौर ऊर्जा प्रकल्पांतून वीजपुरवठा सुरु झाला आहे. महावितरणकडून राज्यातील १०० गावे १०० टक्के सौर ऊर्जेवर नेण्याची मोहीम सुरु असून त्यात टेकवडी गावाची निवड झाली होती. यात सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातल्या मान्याची वाडीनं प्रथम क्रमांक मिळवला होता.

****

राज्यातील चित्रपट आणि मनोरंजन क्षेत्रातील बदलत्या पद्धतींच्या अनुषंगानं राज्य सरकारनं “चित्रपट धोरण समिती” गठीत करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

****